महा मेट्रो
NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## मेट्रो महा कार्ड मोफत आता ३० सप्टेंबरपर्यंत




नागपूर: प्रवाशांना सुलभ आणि किफायतशीर प्रवासासाठी नेहमीच नव-नवीन उपाययोजना केल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून महा मेट्रो नागपूरच्या वतीने महा कार्डसाठी लागू असणाऱ्या शुल्कावर १००% सूट देण्याचा निर्णय १५ सप्टेंबर पर्यंत देण्यात आला होता जे कि आता ३० सप्टेंबरपर्यंत हे महा कार्ड आता मोफत मिळवू शकता. केवळ रु.200 चा टॉप-अप करून आपण हे महा कार्ड मोफत मिळवू शकता.

हे कार्ड पदवीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. महा कार्ड स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या सहकार्याने जारी करण्यात आले असून, सामान्य प्रवाशांसाठी मेट्रो भाड्यावर १०% सवलत आणि विद्यार्थ्यांसाठी ३०% सवलत दिली जाते.

उल्लेखनीय आहे कि पदव्युत्तर (पोस्ट ग्रेजुएट) विद्यार्थ्यांना महा कार्ड देखील अगदी मोफत देण्यात येत आहे महा कार्डसाठी लागू असणाऱ्या शुल्कावर १००% सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.केवळ रु.200 चा टॉप-अप करून आपण हे महा कार्ड मोफत मिळवू शकता.हे कार्ड पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असून, प्रवासाच्या मेट्रो भाड्यावर १०% सवलत दिली जाते.